| | | | | |
|---|---|---|---|---|
| CNR No. MHTH120030142017 | दाखल तारीख | : ०४ | ०७ | २०१७ |
| | नोंदणी तारीख | : ०४ | ०७ | २०१७ |
| | निकाल तारीख | : २३ | ०५ | २०२५ |
| | कालावधी | : ०७व | १०म | १८दि |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र. ८) बेलापुर यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी श्रीमती पी. जे. शेटटी यांचे समक्ष)**

**नियमित फौजदारी खटला क्र. ७८४/२०१७** **निशाणी क्र. (३७)**

| | |
|---|---|
| | गुन्हा क्र : I ३१/२०१७<br>पोलिस स्टेशन : रबाळे एमआयडीसी |
| तक्रारकर्ता | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलिस स्टेशन, रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे |
| अधिवक्ता | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. आर. एस. सोनटक्के |
| आरोपी | **१. आशा चंद्रकांत वाघे**<br>वय- ४० वर्षे, व्यवसाय - मजुरी<br>रा. दत्त मंदिराच्या बाजुला, रामनगर, दिघा, नवी मुंबई |
| अधिवक्ता | आरोपींतर्फे विधिज्ञ श्री.एस.पी.मोरे |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | दि.०३-०२-२०१७रोजी १०:३० वाजेच्या सुमारास |
| प्रथम खबरी तारीख | ०३-०२-२०१७ |
| आरोपपत्राची दाखल तारीख | ०४-०७-२०१७ |
| आरोपपत्र निश्चित केल्याची तारीख | १३-०२-२०२४ |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | ०९-१०-२०२४ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | --- |
| न्यायनिर्णयाची तारीख | २३-०५-२०२५ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख जर असेल तर | निरंक |

| क्र | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | आरोपीने केलेले गुन्हे | निर्दोष किंव्हा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४२८ फौ.प्र.सं च्या उद्देशाने खटलेल्या वेळी अटकेचा |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | कालावधी |
| १ | **आशा चंद्रकांत वाघे** | ०३-०२-२०१७ | ०४-०२-२०१७ | भा.द.वि. कलम ३८० सहकलम ३४ अन्वये | निर्दोष | - | - |

**न्या य नि र्ण य**

**(घोषणा दिनांक २३/०५/२०२५)**

आरोपी हे भारतीय दंड विधान संहिता कलम ३८० सहकलम ३४ अन्वये निश्चित केलेल्या दोषारोपाच्या संपरिक्षेसाठी प्रस्तुत खटल्यात सामोरे गेले आहेत.

**अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

**०२.** दि. ०३-०२-२०१७ रोजी १०:३० वाजेच्या सुमारास अनब्रिको कंपनीमध्ये, दिघा, नवी मुंबई येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी यांचे बंद कंपनीचे उघडया दरवाजा वाटे आत प्रवेश करुन सुमारे १३००/- रुपये किंमतीचे विविध आकाराचे लोखंडी नटबोल्ट गोणीमध्ये भरून चोरी केली. म्हणुन फिर्यादी यांनी रबाळे पोलीस स्टेशन येथे त्यांचे विरूध्द फिर्याद दाखल केली.

**०३.** सदरच्या फिर्यादीवरुन आरोपीं विरुध्द गुन्हा क्र. ३१/२०१७ भा.द.वि. कलम ३८० सहकलम ३४ अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक अे. अे. गावडे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, कागदपत्र हस्तगत केली, मुददेमाल हस्तगत केला व तपासपूर्ण करुन आरोपीं विरुध्द सदर न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

**०४.** आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम ३८० सहकलम ३४ अन्वये दोषारोप (नि.१७) निर्धारीत केले. सदर दोषारोप आरोपींना मातृभाषेत समजावून सांगितला असता त्यांनी आरोप नाकारले व खटला चालविण्याची मागणी केली .

प्रस्तुत खटल्यामध्ये सरकारपक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्याअंती आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१) ब अन्वये निवेदन निशाणी क्र. ३६ अन्वये नोंदविण्यात आले. आरोपींनी केस खोटी असल्याचा बचाव केला.

**०५.** **<u>युक्तीवाद, मुददे व निष्कर्ष :-</u>** सरकारपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता

श्री. आर. एस. सोनटक्के यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. आरोपीतर्फे वकील श्री. श्री.एस.पी.मोरे यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणाच्या न्यायीक निकालासाठी उदभवलेले मुददे, त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिदध् केले काय की, दि. ०३-०२-२०१७ रोजी १०:३० वाजेच्या सुमारास अनब्रिको कंपनीमध्ये, दिघा, नवी मुंबई येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी यांचे बंद कंपनीचे उघडया दरवाजा वाटे आत प्रवेश करुन सुमारे १३००/- रुपये किंमतीचे विविध आकाराचे लोखंडी नटबोल्ट गोणीमध्ये भरून चोरी केली व अशाप्रकारे भारतीय दंड विधान कलम ३८० सहकलम ३४ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला ? | ..... नाही |
| २. | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## -: कारणमिमांसा :-

### अ. अभियोग पक्ष :-

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| ०१ | गोपाळ आनंदा करवंदे | २० | फिर्यादी |
| ०२ | मोहन गुंडाजी सोनवणे | २४ | पंच |
| ०३ | रसिका जिजाबा जाधव | ३० | तपासी अंमलदार |
| ०४ | गंगाराम मल्लप्पा हेळवी | ३१ | तपासी अंमलदार |
| ०५ | आदिनाथ आनंदा गावडे | ३४ | तपासी अंमलदार |

### ब. आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर :-

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

### क. न्यायालया कडून साक्षीदार, जर असेल तर :-

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | | | तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
| | निरंक | | |

**फिर्यादीपक्ष/आरोपी पक्ष/ न्यायालयातील निशाणी क्रमांकांची यादी**

**अ. फिर्यादीपक्ष :-**

| **क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १ | २१ | जबाब |
| २ | २२ | प्रथमखबर अहवाल |
| ३ | २६ | घटनास्थळ पंचनामा |
| ४ | २७ | जप्ती पंचनामा |
| ५ | ३५ | जप्ती पंचनामा पावती |

**ब.बचाव पक्ष :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालय :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | |

**०६.** आरोपींविरुध्दचा भारतीय दंड विधान संहिता कलम ३८० सहकलम ३४ अन्वये चा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाला हे सिध्द करणे गरजेचे आहे की, दि. ०३-०२-२०१७ रोजी १०:३० वाजेच्या सुमारास अनब्रिको कंपनीमध्ये, दिघा, नवी मुंबई येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी यांचे बंद कंपनीचे उघडया दरवाजा वाटे आत प्रवेश करुन सुमारे १३००/- रुपये किंमतीचे विविध आकाराचे लोखंडी नटबोल्ट गोणीमध्ये भरून चोरी केली .

**<u>मुददे क्र. १ व २ करीता :-</u>**

**०७.** सर्व मुददे एकमेकांशी संलग्न असुन ग्राहय धरला जाणारा पुरावा हा देखील सारख्याच स्वरुपाचा असल्याने सर्व मुददांचा एकत्रित विचार करणे न्यायोचित ठरते. आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने भारतीय दंड विधान, १८६० चे

कलम ३८० सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला हे सिध्द करणे आवश्यक आहे.

०९. अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता साक्षीदार क्र १ (अ.सा.क्र.१) यांचा पुरावा अभिलेखावरील नि.क्र. २० वर दाखल करण्यात आलेला आहे. साक्षीदारांच्या साक्षीत आले आहे की, सन २०१७ मध्ये ते रबाळे एमआयडीसी पोलिस स्टेशन येथे पो.शिपाई म्हणुन कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले आहे . दि.०३/०२/२०१७ रोजी ते दिवसपाळी बिटमार्शल १ या कर्तव्यावर असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सदर दिवशी त्यांना पो.ना.ढोले यांनी फोनदवारे कळविले होते की, अंब्रेगो कंपनी दिघा येथे काही इसम चोरी करण्याकरीता आत शिरलेले आहेत. सदर माहितीवरून त्यांनी बिटमार्शल २ या कर्तव्यावर असलेले शिंदे व संकपाळ यांना मदतीसाठी बोलवले होते. सदर ठिकाणी त्यांना पाहुन सदर चोरी करणारे दोन इसम व एक महिला पळुन जाण्याचा प्रयत्न करत होते पंरतु त्यांनी आरोपींना जागीच पकडुन त्यांच्या चौकशी अंतर्गत आरोपींनी त्यांचे नाव चंद्रकांत वाघे तर दुस-याचे नाव सुरज सोळंकी व महिलेचे नाव आशा वाघे असे त्यांनी सांगितले. तसेच त्यांच्या ताब्यातून दोन गोण्या मिळुन आले असुन त्यातील एका गोणीत ४० किलो व दुस-या गोणीत ३५ किलो बोल्ट मिळुन आले असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनतर त्यांनी सदरील माल घेऊन ते आरोपीसह पोलिस स्टेशन येथे गेले होते. सदर कंपनी बंद असल्याने त्यांनी सदर गुन्हयाची तक्रार नि क्र २१ अन्वये सरकारतर्फे दाखल केली होती. त्यांनतर त्यांनी छापील फिर्यादीस नि क्र २२ देण्यात आले आहे. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात सदर साक्षीदाराने मान्य केले की,पो.ना.ढोले यांनी सदर दिवशी किती वाजता फोन केला तसेच सदर परिसरात ते वाहनाने किंवा चालत गेले याबाबतचा मजकुर त्यांच्या जबाबात नमुद नसल्याचे त्यानी मान्य केले आहे. तसेच साक्षीदाराने पुढे हे देखील मान्य केले आहे की, सदर कंपनीमध्ये कोणत्या गेटमधुन प्रवेश केला याबाबतचा मजकुर त्यांच्या जबाबात नमुद नाही. साक्षीदाराने पुढे हे देखील मान्य केले की, सदर कंपनीस एकच मेन गेट असुन सदर कंपनीचा परिसर हा एक एकर आहे. तसेच त्यांनी पुढे मान्य केले आहे की, आरोपीच्या ताब्यात कोणत्या प्रकारच्या प्लॅस्टीकच्या किंवा सुताच्या गोण्या होत्या व त्याची साईज किती होती याबाबतचा मजकुर देखील त्यांच्या जबाबात नमुद करण्यात आलेला नाही. साक्षीदाराने पुढे मान्य केले आहे की, आरोपींना पकडले होते त्यावेळेस त्यांच्या हातात काहीच नव्हते तसेच कंपनीत जात असताना त्यांनी वजन काटे वगैरे

काहीएक नेले नसल्याचे सागिंतले आहे. त्यानंतर पुढे त्यांनी मान्य केले की, सदरील मुददेमालाचे वजन हे पोलिस चौकीमध्ये गेल्यानंतर केले असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

१०. अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता निवेदन व जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार मोहन गुंडाजी सोनवणे (अ.सा.क्र.२) यांचा पुरावा अभिलेखावरील नि.क्र. २४ वर दाखल करण्यात आला असुन त्यांनी त्यांचे साक्षीजबाबात असे कथन केले आहे की, दि.०३/०२/२०१७ रोजी पोलीसांनी त्यांना एपीआय गावडे यांनी घटनास्थळ पंचनाम्यासाठी दिवा गाव येथे बोलावले होते. तेव्हा सदर वेळेस त्यांच्यासोबत दुसरा पंच धांडे हे होते. सदर ठिकाणी बंद पडलेली कंपनी अनब्रिको येथुन आरोपींनी लोखंडी नटबोल्ट चोरी करताना मिळुन आल्याचे त्यांनी सांगितले आहे. सदर घटनेबाबत त्यांना पो.शि. करवंदे यांनी सांगितले होते. सदर ठिकाणचा पंचनामा करण्यात आला असुन ४०किलो वजनाचे व ३५ किलो वजनाचे वेगवेगळया प्रकारचे नटबोल्ट ताब्यातून मिळून असल्याचे त्यांनी सांगितले. सदरच्या पंचनाम्यावर अनु क्र १ वर त्यांची सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. सदर पंचनाम्यास नि क्र २६ देण्यात आले होते. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात सदर साक्षीदाराने मान्य केले की, सदरील घटनास्थळ नेमक्या कोणत्या प्लॉटवर आहे याबाबत त्यांना सांगता आलेले नाही. तसेच सदरील पंचनामा कोणी लिहिला हे सांगण्यास असमर्थतता दर्शविली आहे. साक्षीदाराने पुढे मान्य केले की, सदरील जप्त करण्यात आलेले नटबोल्ट घटनास्थळावर स्वतंत्रपणे मोजण्यात आले नसुन ते एकत्रितपणे वजनावर मोजले व जप्त नटबोल्ट हे नवीन होते की जुने याबाबत देखील त्यांना सांगण्यात आलेले नाही. तसेच त्यांनी पुढे मान्य केले की, सदरचा जप्त मुददेमाल हा कोणत्या वाहनाने आणला व पिशवीबददलचा उल्लेख नमुद करण्यात आलेले नाही. प्रस्तुत प्रकरणातील पंचनाम्याचे अवलोकन केले असता, पंचनामा दि. ०३.०२.२०१७ रोजी ४ वाजतेच्या सुमारास होवून ५ वाजता पूर्ण करण्यात आले होते. साक्षीदार हे घटनास्थळी १.१५ वाजात पोहोचले असे कथन करत आहेत. सबब घटनास्थळ व जप्ती पंचनामाच्या वेळी ते तेथे होते किंवा कसे याबाबत शंका निर्माण होते.

११. अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता साक्षीदार रसिका जिजाबा जाधव (अ.सा.क्र.३) यांचा पुरावा अभिलेखावरील नि.क्र. ३० वर दाखल करण्यात आला असुन त्यांनी त्यांचे साक्षीजबाबात असे कथन केले आहे की, सन २०१६ – २०१७ मध्ये ते रबाळे एमआयडीसी पोलिस स्टेशन येथे लेखनिक कारकुर म्हणून कार्यरत हाते. दि. ०३.०२.२०१७ रोजी ते नेहमीप्रमाणे कर्तव्यावर आलेनंतर जनरल डयुटी अंमलदार पो.ना.ढोले यांनी सांगितले की, दिघा येथे अनब्रेको कंपनीमध्ये काही लोक चोरीकरण्याच्या उददेशाने गेले असुन त्यामध्ये एक महिला आहे त्यामुळे त्यांना सदर ठिकाणी जाण्याचे आदेश देण्यात आले होते. सदर ठिकाणी पो.ना.हेळवी, पो. ना.संपकाळ, पो.शि. करवंदे, पो.शि. शिंदे हे हजर होते. तसेच सदर ठिकाणी दोन इसमांसोबत एक महिला उभी असल्याने ते चोरी करण्याच्या उददेशाने कंपनीमध्ये आले होते. त्यानंतर सदर महिलेस त्यांनी ताब्यात घेऊन मुददेमालासह पोलिस स्टेशन येथे गेले. तदनंतर पोलिस स्टेशन येथे पो.शि कर्मचा-यांनी फिर्याद दाखल केली होती. तसेच त्यांनी आरोपी आशा वाघे यांना न्यायालयासमक्ष ओळखले होते. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात सदर साक्षीदाराने मान्य केले की, सदरील घटनास्थळ नेमक्या कोणत्या प्लॉटवर आहे याबाबत त्यांना सांगता आलेले नाही. साक्षीदाराने पुढे मान्य केले की, सदरील मुददेमाल हा महिला आरोपी आशा वाघे यांच्या ताब्यातून जप्त करण्यात आला किंवा कसे याबाबत त्यांना काहीएक सांगता आलेले नाही. तसेच त्यांनी पुढे मान्य केले की, सदरचा जप्त मुददेमाल हे नेमके किती वजनाचा आहे किंवा कसे त्याबाबतचा मजकुर त्यांच्या जबाबात नोंदविण्यात आलेला नाही. साक्षीदाराने पुढे हे देखील सांगितले आहे की, सदर घटनेनंतर त्यांचा जबाब १७ दिवसांनी नोंदविला गेला होता. सदर साक्षीदार यांनी आरोपीचे ताब्यातून नटबोल्ट जपत करण्यात आले किंवा कसे हे सांगण्यास अमर्थतता दर्शविली आहे. सबब सदर साक्षीदारांचे साक्षी जबाबावरून आरोपीने नटबोल्टची चोरी केली व आरोपीच्या ताब्यातून ते जप्त करण्यात आले हि बाब निर्विवादपणे शाबित होत नाही.

१२. अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता साक्षीदार गंगाराम मल्ल्पा हेळवी (अ.सा.क्र.४) यांचा पुरावा अभिलेखावरील नि.क्र. ३१ वर दाखल करण्यात आला असुन त्यांनी त्यांचे साक्षीजबाबात असे कथन केले आहे की, सन २०१६-

२०१७ मध्ये ते रबाळे एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे जनरल डयुटी अंमलदार म्हणुन कार्यरत होते. दि. ०३.०२.२०१७ रोजी ते बीट मार्शल म्हणुन कर्तव्यावर असताना त्यांच्यासोबत शिपाई करवंदे होते. सदर वेळेस त्यांना जनरल डयुटी अंमलदार ढोले यांनी अनब्रेको कंपनी येथे काही इसम चोरी करण्यासाठी शिरले असल्याची माहिती फोनवरून दिली होती. त्यांनतर माहितीनुसार सदर कंपनीचे गेटवर गेले असता तेथे कुलूप आढळून आले होते. कंपनीमध्ये प्रवेश केल्यावर तेथे दोन इसम असल्याचे त्यांना समजले. त्यामुळे सदर ठिकाणी दुसरी मार्शल बीट बोलावून घेतले होते. सदर असलेल्या इसमांच्या हातामध्ये एक गोणी आढळून आले असुन त्यामध्ये लोखंडी नट बोल्ट होते. तसेच सदर प्रकरणात एक महिला देखील सामील असून त्यांनी महिला पोलिसांना बोलवून घेतले होते. त्यांनतर त्यांना ताब्यात घेउून पोलिस स्टेशन येथे जाउन सरकारतर्फे शिपाई करवंदे यांनी फिर्याद दाखल केली होती. तसेच त्यांनी आरोपी आशा चंद्रकांत वाघे यांना न्यायालयासमक्ष ओळखले होते. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात सदर साक्षीदाराने मान्य केले की, जनरल डयुटी अंमलदार यांचा फोन आल्यानंतर ते घटनास्थळावर पोहचले होते परंतु त्यांना सदरच्या घटनास्थळाचा प्लॉट क्र सांगता आलेला नाही. तसेच त्यांनी पुढे मान्य केले आहे की, बंद असलेले कंपनीचे गेट कोणी उघडले याबाबतचा मजकूर त्यांच्या जबाबात नमूद करण्यात आलेला नाही. साक्षीदाराने पुढे मान्य केले आहे की, आरोपी कंपनी मध्ये कोणत्या ठिकाणी हजर हाते तसेच त्यांच्या ताब्यातील गोणी नेमकी कशाची होती याबाबतचा मजकूर त्यांच्या जबाबात नमुद नाही. तसेच त्यांनी पुढे मान्य केले आहे की,सदर मुददेमालाचे वजन त्यांच्या समक्ष करण्यात आला असा मजकूर त्यांच्या जबाबात नमूद करण्यात आलेला नाही. सदर साक्षीदाराने घटनास्थळी सकाळी १०.३० च्या सुमारास पोहचले असल्याबाबत कथन केले असल्याचे दिसून येते. तसेच त्यांना घटनास्थळाचे नेमके वर्णन सांगण्यास अपयश आले. सदर साक्षीदाराच्या साक्षी जबाबावरून महिला आरोपी यांच्या ताब्यातून जप्त केले हे स्पष्ट होत नाही. सबब सदर साक्षीदाराची साक्ष आरोपीस दोषी ठरविण्यास पुरेशी वाटत नाही.

१३. अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता साक्षीदार आदिनाथ आनंदा गावडे (अ.सा.क्र.५) यांचा पुरावा अभिलेखावरील नि.क्र. ३४ वर दाखल

करण्यात आला असुन त्यांनी त्यांचे साक्षीजबाबात असे कथन केले आहे की, दि.०३.०२.२०१७ रोजी ते रबाळे एमआयडीसी पोलिस स्टेशन येथे सहा.पो.निरीक्षक म्हणुन कार्यरत होते. सदर गुन्हा त्यांनी स्वत: दाखल करून त्याचा तपासही त्यांनीच केलेला आहे. दि. ०३.०२.२०१७ रोजी ते ठाणे अंमलदार म्हणून कर्तव्यावर असताना पो.शि.करवंदे यांनी गुन्हा दाखल केला होता. त्याप्रमाणे आरोपींविरूदध गुन्हा क्र ३१/२०१७ अन्वये नोदंविण्यात आला असून त्यांच्याविरूदध भा.द.वी स. ३८० सह ३४ अन्वये प्रमाणे नोदंविला होता. सदर गुन्हयाची चौकशी आरोपींकडे केली असून त्यांना अटक केली होती. तसेच आरोंपीकडून तेराशे रूपयांचे लोखंडी नटबोल्ट मिळाले होते. त्याप्रमाणे त्यांनी पंचनामा तयार केला. सदरील जप्ती पंचनाम्यास नि क्र २७ देण्यात आले होते. तसेच जप्त मुददेमाल पावतीस निं क्र ३५ व घटनास्थळ प ंचनाम्यास नि क्र २६ देण्यात आले होते. त्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदवून आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले होते. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात सदर साक्षीदाराने मान्य केले की, घटनास्थळी जाण्याबाबतची नोंद स्टेशन डायरी मध्ये केलेली नाही. तसेच त्यांनी पुढे हे देखील मान्य केले की, सदर घटनास्थळी जाताना खाजगी वाहनाने गेले असून सदरची बाब केस डायरी मध्ये केले नाही. साक्षीदाराने पुढे मान्य केले आहे की, घटनास्थळावरील सीसीटीव्ही फूटेज दोषारोपपत्रामध्ये सामील केलेले नाही.

**१४.** एकंदरीत अभियोग पक्षामार्फत तपासण्यात आलेल्या साक्षीदारांचे साक्षीजबाबाचे अवलोकन केले असता, अभियोगपक्षातर्फे फिर्याद शाबीत झाली असली तरी फिर्यादीतील नमुद मजकुर अभियोगपक्षाने शाबीत करणे आवश्यक आहे. तसेच आरोपीने सदरील मुददेमाल कंपनीत घुसुन चोरुन नेला हे शाबीत करणे आवश्यक आहे. फिर्यादी यांचे कथनानुसार त्यांना सदर घटनेबाबत पोलिस नाईक ढोले यांनी कळविले असे दिसून येत असून पोलिस नाईक ढोले यांना सदर घटनेबाबत नेमके किती वाजता कोणाकडून समजले हे शाबित करण्याकरीता पोलिस नाईक ढोले यांना तपासण्यास अभियोगपक्षास अपयश आले आहे. तसेच घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनाम्याचे अवलोकन केले असता सदरील पंचनामा हा दि.०३.०२.२०१७ रोजी ४ वाजेच्या सुमारास करण्यात आला असून ५ वाजता संपुष्टात आला व फिर्यादी व इतर साक्षीदार यांचे साक्षीजबाबावरून सदरील घटना सकाळी १०.३०

च्या सुमारास घडली असे स्पष्ट होते. सबब नेमके घटना किती वाजता घडली याबाबत शंका निर्माण होते. तसेच पंचानी देखील घटनास्थळाचे नेमके ठिकाण पंचनाम्याची अचूक वेळ सांगण्यास असमर्थतात दर्शविली असल्याने एकंदरीतच सदरील पंच हे पंचनाम्यावेळी हजर होते किंवा कसे याबाबत शंका निर्माण होते. अभियोगपक्षामार्फत सदरील कंपनी बंद असून तेथे नटबोल्ट कोठून आले ते नटबोल्टचे उत्पादन पूर्वी केले जात हाते किंवा कसे याबाबत पुष्टी देणारा पुरावा अभलेखपक्षामार्फत तपासण्यात आलेल्या साक्षीदार यांनी आरोपी घटनेच्या वेळी नेमके कोठे होती, तिच्या ताब्यातून नेमके काय जप्त करण्यात आले हे निर्विवादपणे शाबित करण्यात आले नाही. साक्षीदाराने सांगितलेली घटनेची वेळ व पंचनाम्यामधील वेळ यामध्ये तफावत दिसून येत असून नेमकी घटना घडली किंवा कसे याबाबत शंका निर्माण होत असल्याने आरोपी हिस जपत मुददेमाालाची चोरी करताना पकडण्यात आले हि बाब निर्विवादपणे शाबित होत नाही. सदरील मुददेमाल हा महिला आरोपी आशा वाघे यांच्या ताब्यातून जप्त करण्यात आला किंवा कसे या कथनास पुष्टी देण्याकरीता अभियोगपक्षामार्फत कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. आरोपी कंपनी मध्ये कोणत्या ठिकाणी हजर हाते तसेच त्यांच्या ताब्यातील गोणी नेमकी कशाची होती ही बाब न्यायपलटावर शाबीत झालेली नाही. सबब अभियोगपक्षास साक्षीदारांच्या साक्षी जबाबातुन गुन्हयाची शृंखला शाबीत करण्यास अपयश आले. सबब सदरील आरोप संशयापलीकडे जावुन सिध्द केला असे म्हणता येणार नाही. सबब सदरची घटना घडली किंवा कसे याबाबत साशंकता निर्माण होते. आरोपींवरील आरोप ज्या घटनेवर आधारीत आहेत, ती घटना सबळ पुराव्याअभावी अभियोगपक्षाने सिध्द न केल्याने सदरचे आरोप तंतोतंतपणे सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी झाले आहेत, असे म्हणता येईल. यावरुन सदर घटनेशी आरोपींचा संबंध प्रस्थापित करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे, असे स्पष्ट होते. प्रस्तुत खटल्याबाबत पोषक असा पुरावा अभियोगपक्षाने न दिल्याने प्रस्तुत प्रकरणातून आरोपींना निर्दोष मुक्त करणे न्यायोचित ठरते. सबब, मी मुद्दा क्र.०१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ बाबत :-</u>**

**१६.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदार यांच्याकडुन गुन्हा सिध्द करणारा कुठलाही सबळ पुरावा न्यायपटलावर आलेला नाही. सबब आरोपी हे निर्दोष मुक्त

होण्यास पात्र आहे. सबब, वर नमुद चर्चेअंती मुददा क्र.२ च्या अनुषंगाने मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

**—: आ दे श :—**

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.**१ आशा चंद्रकांत वाघे** यांची भारतीय दंड विधान संहिता कलम ४५७ व ३८० सहकलम ३४ या दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २४८ (१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींचा जातमुचलका व जामीन कदबा रदद करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपींना असा निर्देश करण्यात येतो की, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७ (अ) प्रमाणे अपील कोर्टात हजर राहण्याविषयीचे बंधपत्र दयावे. |
| ४. | गुन्हयातील जप्त मुददेमाल रक्कम १३००/- रूपयांचे विविध आकाराचे लोंखडी नट बोल्टचे दोन गोण्या हे अपिल कालावधीनंतर मुळ मालक यांना नियमानुसार परत करण्यात यावेत. |

**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित**

स्वाक्षारित/-
(श्रीमती. पी. जे. शेट्टी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(८ वे कोर्ट), बेलापूर, नवी मुंबई.

ठिकाण : सी.बी.डी. बेलापूर
दि. : २३/०५/२०२५